**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18**

**अ प्रभाग समिती**

**सभावृत्तांत [कार्यपत्रिका क्रमांक 03]**

**दिनांक : 12/06/2018** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची माहे जून 2018 ची मासिक सभा मंगळवार दिनांक 12/06/2018 रोजी सकाळी 11.30 वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजमाता जिजाऊ सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. अनुराधा गणपत गोरखे | सभापती |
| 2. | मा. तुषार रघुनाथ हिंगे | सदस्य |
| 3. | मा. यादव मिनल विशाल | सदस्या |
| 4. | मा.वैशाली जालिंदर काळभोर | सदस्या |
| 5. | मा. शैलजा अविनाश मोरे | सदस्या / उपमहापौर |
| 6. | मा. बाबर शर्मिला राजू | सदस्या |
| 7. | मा. अमित राजेंद्र गावडे | सदस्य |
| 8. | मा. जयश्री वसंत गावडे | सदस्या |
| 9. | मा. सावंत राजेश पोपट | स्वीकृत सदस्य |
| 10. | मा. कदम सुनिल मानसिंग | स्वीकृत सदस्य |
| 11. | मा.कांबळे राजेंद्र नामदेव | स्वीकृत सदस्य |

याशिवाय श्री *दिपक सुपेकर*, मा.प्र.कार्यकारी अभियंता स्थापत्य, श्री. विशाल कांबळे – मा. कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा ,श्री. संजय खाबडे, मा.कार्यकारी अभियंता विद्युत, श्री आर.के.लटपटे –प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री कदम पी.जे.लेखाधिकारी, श्रीमती लता बाबर,, श्री. राजेंद्र राणे, श्री. दिपक कुंभार, श्री लक्ष्मीकांत कोल्हे, श्री. सुभाष काळे, श्री विजय जाधव, श्री चंद्रकांत मुठाळ , श्री व्ही.बी.माने, श्री एम.आय.खोंद्रे -सर्वश्री उपअभियंता , श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री संजय जाधव, पीएसआय,निगडी वाहतूक विभाग, श्री. निखील फेंडर , श्री कुंभार प्र..गो., श्री सन्मान भोसले, श्री गिरिश गुंठे, श्री. पाटील एस.पी. - कनिष्ठ अभियंता, श्री नागनाथ पारसी, आरोग्य निरिक्षक पशुवैद्यकिय विभाग, श्री पगार एस.जी., जनरेटर ऑपरेटर इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

सर्वप्रथम मा. सभापती, अनुराधा गणपत गोरखे यांनी सर्व उपस्थित पदाधिकारी, सन्मा. नगरसदस्य, अधिकारी यांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली. तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र.२ दि. 08/05/2018 रोजीचा अ प्रभाग समितीचा सभावृत्तांत कायम करणेत आला.

त्यानंतर प्रस्तुत सभेमध्ये खालील विषय ऐनवेळचे विषय म्हणून दाखल करुन घेण्यात आले.

विषय क्रमांकः-2 मा.क्षेत्रिय अधिकारी अ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्थापत्य/६१८/२०१८ दि.२४/०५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्र.क्र.१९ मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे या कामाचे अंतर्गत स्थळबदल करुन काम करणेकामी मान्यता मिळणे.

**विषय क्रमांक :- 3** सन्मा.. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे कर्मचारी यांचे कामकाज साईटवर चालत असते, त्या कर्मचा-यांना पिण्याच्या पाण्याची सोय तसेच चेंजिंग रुमची आवश्यकता आहे. तरी अ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात सर्व ठिकाणी आरोग्य कर्मचा-यांना चेंजिंग रुम बांधून सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याची सोय उपलब्ध करुन देणे.

**विषय क्रमांक :- 4** सन्मा.सदस्य् सुनिल मानसिंग कदम यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव

आकुर्डी वॉर्ड क्रमांक 15 मधील पंचतारानगर विघ्नहर्ता गणेश मंदिरासमोरील पांढारकरनगरकडे जाणा-या रस्त्याला "कै पै.गोरक्ष शामराव निंबळे पथ" असे नामकरण करणे.

तसेच आकुर्डी वॉर्ड क्र.१५ मधील भैरवनाथ मंदिराजवळील रस्त्यास "कै.कु.सुमित मनोहर जाधव" असे नामकरण करणे.

**विषय क्रमांक :-5** सन्मा.सदस्या मिनल विशाल यादव यांचा दि. 12/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

सालाबादप्रमाणे जगतगुरु संततुकाराम महाराज पालखीचे आपल्या पिंपरी शहरामध्ये आगमन होते व त्याचा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरामध्ये होतो त्यामुळे मोहननगर आणि काळभोरनगर परिसरातील मंदिरात अनेक वारकरी मुक्कामासाठी थांबतात. पावसाळयामुळे
वारक-यांना उघडयावर झोपणे शक्य होत नाही तसेच सकाळी आंघोळी व इतर सुविधांची गैरसोय होते व वारक-यांचे आतोनात हात होतात. तरी आपल्या महानगरपालिकेचे मोहननगर परिसरातील जिजामाता सांस्कृतिक भवन आहे या ठिकाणी बाथरुम व पाण्याची सोय उपलब्ध आहे. तरी सदरचे जिजामाता सांस्कृतिक भवन वारक-यांना दरवर्षी मुक्कामासाठी उपलब्ध करुन देणेस मान्यता देणे

**विषय क्रमांक:-6** सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर येथील महानगरपालिकेचा जो दवाखाना आहे तो मागील बाजूस व वरचे मजल्यावर असल्याने लोकांना माहिती पडत नाही, त्यामुळे समाजातील अनेक घटक त्यापासून वंचित रहात आहेत, तरी त्या ठिकाणी दवाखान्याचे समोरील मोकळी जागा आहे तेथे नवीन दवाखाना संभाजीनगर येथील अंब्रेला दवाखान्याप्रमाणे बांधल्यास जेणेकरुन मोहननगर, रामनगर, शंकरनगर, विद्यानगर येथील नागरिकांना सोय होईल. तरी सदर ठिकाणी नवीन दवाखाना बांधणेस मान्यता देणे.

**विषय क्रमांक :- 7 सन्मा..** सभापती अनुराधा गोरखे , अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

सध्या शाळा सुरु झाल्या आहेत, शाळांचे आजूबाजूस वर्दळीचे ठिकाणी अपघात होणेची शक्यता नाकारता येत नाही, तरी प्रभाग क्रमांक १० मधील शाळांचे बाजूबाजूस तसेच इंदिरानगर,बर्ड व्हॅली चौक, खंडोबा चौक, आगाखान रस्ता, खडीमशिन शाहूनगरकडे जाणारा एचडीएफसी रोड, महादेव मंदिरासमोर, पंचशील हॉटेलकडे वळताना, म्हाळसाकांत चौक आकुर्डी चारही रस्ते, अभिषेक शाळेजवळ इ.ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविणेस मान्यता देणे.

विषय क्रमांक:- 8 सन्मा.राजेंद्र कांबळे, स्वीकृत नगरसदस्य् यांचा दि.12/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

- वॉर्ड क्र.१९ मधील दळवीनगर पुलावर जाण्यासाठी जो जीना आहे तो पूर्ण तुटलेला आहे तो दुरुस्त् करणे
- भाटनगर येथील बिल्डिंग नं. १ ते १६ या सर्व बिल्डिंगचे जिने तुटलेले आहेत ते दुरुस्त् करणे.
- भाटनगर येथील बिल्डिंग नं.१ ते १६ बिल्डींग पावसाळयात पूर्ण् गळतात त्यांचे टेरसचे काम करुन देणे.
- भाटनगर येथील लाईट दुरुस्त करुन देणेत मान्यता देणे
- प्र.क्र.१९ मधील पूर्ण झोपडपट्टीच्या आतील गटारी साफसफाई करणेस मान्यता देणे.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेण्यात आले.

ठराव क्रमांक 09
दिनांक 12/06/2018
सुचक: मा. शैलजा मोरे

विषय क्रमांक 1
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा.एकनाथ पवार, सत्तारुढ पक्षनेता यांचा दिनांक १६/५/२०१८ रोजीचा प्रस्ताव.

भारतील लहुजी पँथर,भोसरी यांनी दि.१५/०५/२०१८ रोजीचे दिलेल्या निवेदनानुसार काळेवाडी फाटा ते पवना नदी, मुंबई-पुणे रेल्वे मार्ग व मंबई-पुणे जुना महामार्ग ओलांडणा-या उड्डाणपूल मार्गास क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे असे नामकरण करणेबाबत विनंती केली आहे.

काळेवाडी फाटा ते पवना नदी, मुंबई-पुणे रेल्वे मार्ग व मुंबई-पुणे जुना महामार्ग ओलांडणा-या उड्डाणपुल मार्गास **"क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे "** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 10
दिनांक 12/06/2018
सुचक: मा. शर्मिला बाबार

विषय क्रमांक 2
विभाग : स्थापत्य अ क्षेत्रिय कार्यालय यांचा प्रस्ताव .
अनुमोदक : मा. मिनल यादव

संदर्भ:- मा.क्षेत्रिय अधिकारी अ क्षेत्रिय कार्यालय यांचेकडील पत्र क्र.अक्षेका/स्थापत्य/६१८/२०१८ दि.२४/०५/२०१८ रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 19 मधील अतिक्रमण कारवाईसाठी मशिनरी पुरविणे या कामाचे आदेश दि.५/३/२०१८ रोजी कामाचे ठेकेदार श्री शरदचंद्र वसंतराव गोटे यांना देणेत आले आहेत. सदर कामाची मुदत १२ महिने म्हणजेच दि.०४/०३/२०१९ पर्यत आहे. सदरचे काम प्र.क्र.१९ मधील अतिक्रमण कार्यवाही करणेकामी मशिनरी पुरविणेचे असून अतिक्रमण विभागाकडून मागणी आलेनुसार त्यांना संबधित ठेकेदार यांचेकडून मशिनरी व मजूर कर्मचारी उपलब्ध करुन दिला जातो. तथापि सदरचे मागणीनुसार काम फक्त वॉर्ड क्र.१९ करिता आहे. त्यामुळे सदर कामात बचत राहणार आहे असे मत आहे.

नाले साफसफाई करणेकामी जे.सी.बी.ची आवश्यकता असलेबाबत मागणी सहा.आरोग्याधिकारी यांनी या विभागाकडे केलेली आहे, सदर काम करणेकरिता सदर बाब असलेले चालू काम सद्यस्थितीत उपलब्ध नाही. त्यामुळे सदरचे काम या कामातून करुन घेणे योग्य होईल. तसेच अ प्रभाग समितीचे कार्यक्षेत्रात प्रभाग क्र.१९ व्यतिरिक्त क्षेत्रासाठी अतिक्रमण कार्यवाही करणेसाठी मशिनरी पुरविणेकामी स्वतंत्रपणे काम उपलब्ध नाही. तरी अ प्रभाग समितीचे कार्यक्षेत्रात सदरचे काम करणे योग्य होईल.

तरी प्रस्तावात नमूद केलेनुसार सदरचे कामातून प्रभाग क्र.१९ मधील नाले साफसफाई करुन घेणेकामी तसेच राडारोडा उचलणेकामी मशिनरी व संपूर्ण अ क्षेत्रिय कार्यालय समितीचे कार्यक्षेत्रात अतिक्रमण कारवाईकामी मशिनरी पुरविणेकामी सदरच्या विषयास स्थळबदल करणेकामी मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 11 विषय क्रमांक 3
दिनांक 12/06/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. शैलजा मोरे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ सन्मा.. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव

महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाचे कर्मचारी यांचे कामकाज साईटवर चालत असते, त्या कर्मचा-यांना पिण्याच्या पाण्याची सोय तसेच चेंजिंग रुमची आवश्यकता आहे. तरी अ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्रात सर्व ठिकाणी आरोग्य कर्मचा-यांना चेंजिंग रुम बांधून सदर ठिकाणी पिण्याचे पाण्याची सोय उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 12 विषय क्रमांक 4
दिनांक 11/06/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा. मा शर्मिला बाबार अनुमोदक : मा तुषार हिंगे

संदर्भ :- सन्मा. स्वीकृत सदस्य् सुनिल मानसिंग कदम यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव

आकुर्डी वॉर्ड क्रमांक 15 मधील पंचतारानगर विघ्नहर्ता गणेश मंदिरासमोरील पांढारकरनगरकडे जाणा-या रस्त्याला **"कै पै.गोरक्ष शामराव निंबळे पथ"** असे नामकरण करणेस तसेच आकुर्डी वॉर्ड क्र.15 मधील भैरवनाथ मंदिराजवळील रस्त्यास **"कै.कु.सुमित मनोहर जाधव पथ"** असे नामकरण करणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 13 विषय क्रमांक 5
दिनांक 12/06/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा.मिनल यादव अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ :- सन्मा.सदस्या मिनल विशाल यादव यांचा दि. 12/06/2018 रोजीचा प्रस्ताव

सालाबादप्रमाणे जगद्गुरु संततुकाराम महाराज पालखीचे आपल्या पिंपरी शहरामध्ये आगमन होते व त्याचा मुक्काम आकुर्डी येथील विठ्ठल मंदिरामध्ये होतो त्यामुळे मोहननगर आणि काळभोरनगर परिसरातील मंदिरात अनेक वारकरी मुक्कामासाठी थांबतात. पावसाळ्यामुळे वारक-यांना उघडयावर झोपणे शक्य होत नाही तसेच सकाळी आंघोळी व इतर सुविधांची गैरसोय होते व वारक-यांचे आतोनात हाल होतात. तरी आपल्या महानगरपालिकेचे मोहननगर परिसरातील जिजामाता सांस्कृतिक भवन आहे या ठिकाणी बाथरुम व पाण्याची सोय उपलब्ध आहे. तरी सदरचे जिजामाता सांस्कृतिक भवन वारक-यांना दरवर्षी मुक्कामासाठी दोन दिवस उपलब्ध करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 14 विषय क्रमांक 6
दिनांक 12/06/2018 विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
सुचक: मा तुषार हिंगे अनुमोदक : मा. शर्मिला बाबर

संदर्भ:- सन्मा. सभापती अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती व मा.शैलजा मोरे,उपमहापौर यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 10 मधील दत्तनगर येथील महानगरपालिकेचा जो दवाखाना आहे तो मागील बाजूस व वरचे मजल्यावर असल्याने लोकांना माहिती पडत नाही, त्यामुळे समाजातील अनेक घटक त्यापासून वंचित रहात आहेत, तरी त्या ठिकाणी दवाखान्याचे समोरील मोकळी जागा आहे तेथे नवीन दवाखाना संभाजीनगर येथील अंब्रेला दवाखान्याप्रमाणे बांधल्यास जेणेकरुन मोहननगर, रामनगर, शंकरनगर, विद्यानगर येथील नागरिकांची सोय होईल. तरी सदर ठिकाणी नवीन दवाखाना बांधणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 15
दिनांक 12/06/2018
सुचक: मा. शैलजा अविनाश मोरे

विषय क्रमांक 7
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा. शर्मिला बाबार

संदर्भ **सन्मा**.. सभापती अनुराधा गोरखे , अ प्रभाग समिती यांचा दि. 11/06/2018 रोजीचा प्रस्ताव

सध्या शाळा सुरु झालेल्या आहेत, शाळांचे आजूबाजूस वर्दळीचे ठिकाणी अपघात होणेची शक्यता नाकारता येत नाही, तरी प्रभाग क्रमांक १० मधील शाळांचे आजूबाजूस तसेच इंदिरानगर,बर्ड व्हॅली चौक, खंडोबा चौक, आगाखान रस्ता, खडीमशिन शाहूनगरकडे जाणारा एचडीएफसी रोड, महादेव मंदिरासमोर, पंचशील हॉटेलकडे वळताना, म्हाळसाकांत चौक आकुर्डी चारही रस्ते, अभिषेक शाळेजवळ इ.वर्दळीच्या ठिकाणी स्पीड ब्रेकर बसविणेस मान्यता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

ठराव क्रमांक 16
दिनांक 12/06/2018
सुचक: मा. जयश्री गावडे

विषय क्रमांक 8
विभाग : सन्मा. सदस्यांचा प्रस्ताव
अनुमोदक : मा.वैशाली जालिंदर काळभोर

संदर्भ :- सन्मा.राजेंद्र कांबळे व राजेश सावंत, स्वीकृत नगरसदस्य् यांचा दि.12/06/2018 रोजीचा प्रस्ताव.

- वॉर्ड क्र.१९ मधील दळवीनगर पुलावर जाण्यासाठी जो जीना आहे तो पूर्ण तुटलेला आहे तो दुरुस्त् करणेस मान्यता देणेत येत आहे.
- भाटनगर येथील बिल्डिंग नं. १ ते १६ या सर्व बिल्डिंगचे जिने तुटलेले आहेत ते दुरुस्त् करणेस मान्यता देणेत येत आहे.
- भाटनगर येथील बिल्डिंग नं.१ ते १६ बिल्डींग पावसाळयात पूर्ण् गळतात त्यांचे टेरेसचे काम करुन दयावे व घरात पाणी लिकेज होणार नाही याप्रमाणे काम करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे..
- भाटनगर येथील लाईट दुरुस्त करुन देणेस मान्यता देणेत येत आहे.
- १९ प्रभाग क्रमांक मधील पूर्ण झोपडपट्टीच्या आतिल गटारी साफ करणेस व वरील सर्व कामे त्वरीत करुन घेणेस मान्य्ता देणेत येत आहे.

ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज होऊन मा. सभापती, अनुराधा गोरखे, अ प्रभाग समिती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले

[ अनुराधा गणपत गोरखे ]
सभापती
अ प्रभाग समिती
निगडी- 44

क्र. अक्षेका/9/कावि/145/2018 दि. 26/6/2018

प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
अ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति, सर्व संबंधित ----------------------